सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.अ. २४ ठ. क्र. ५९
दि. १२/५/१८ रोजी ठेवला खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



अ) १०५ घंटागाडयासाठी ११० वाहनचालक व ११० बिगारी, (ब) १२० घंटागाडयासाठी १२० चालक व १५० बिगारी बाहय यंत्रणेमार्फत पुरवठा करुन घेणेबाबत ई निवीदा व जाहिर प्रसिध्दीकरण करुन निविदा मागविता,१०५ घंटागाडयासाठी तीन निविदा प्राप्त झालेले असून,१२० घंटागाडयासाठी प्राप्त तीन निविदाधारक याप्रमाणे निविदा आलेले असून, प्रस्तावात नमूद कारणास्तव व सामान्य प्रशासन विभागाने प्रस्तावित केल्यानुसार अ) १०५ घंटागाडयासाठी १५० वाहन चालक व ११० बिगारी (ब) १२० घंटागाडयासाठी १२० वाहन चालक व १५० बिगारी बाहय यंत्रणेमार्फत पुरवठा करुन घेणेकामी ई निविदा व जाहिर प्रसिध्दीकरणास अनुसरुन पुरवठादार आराध्या इन्फ्रास्ट्रक्चर यांनी प्रति वाहन चालक करीता सर्व्हिस चार्ज रु.१९५/- व प्रति बिगारी करीता र.रु.१७३/- हे दिलेले दर सर्वात कमीचे असल्याने सदरचे काम त्यांच्याकडून करुन घेण्यास,प्रस्तावात नमूद प्रमाणे येणारे खर्चास,करारपत्र करुन वर्कऑर्डर देणेस, तथापि यापूर्वी मक्तेदारांमार्फत कचरा संकलन व वाहतूक करण्यासाठी निविदा मंजूर करण्यांत आल्या होत्या, त्याचा वार्षिक खर्च रु.२४ कोटी अधिक प्रतिवर्षी वाढ असा होता.काम व्यवस्थीत न केल्याने मक्ता रद्द करण्यांत आला.स्वच्छ भारत मिशन मा.शासनाच्या महत्वांकाक्षी प्रकल्पामध्ये घरोघरी ओला व सुका कचरा संकलन करणे आवश्यक आहे.यासाठीचे नियोजन करण्यांत आले आहे.तसेच शासनाच्या धोरणांप्रमाणे कामगारांना किमान वेतन देणे बंधनकारक आहे.त्याचाही अंतर्भाव निविदेत केलेला आहे.यास्तव उपरोक्त प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे दोन्ही निविदा मान्यतेस्तव महाराष्ट्र महापालिका अधिनियम १९४९ कलम ७३(क)अन्वये मा.स्थायी समितीकडे निर्णयास्तव सादर करणेकामी मा.आयुक्त यांचे दि.२३/२/१८चे टिपणीने आलेल्या प्रकरणास मान्यता देणेत येत आहे.तसेच पुढील मक्ता मंजूरी होईतोपर्यतच्या कालावधीकरीता सदरचा मक्ता चालू ठेवणेस मा.स्थायी समिती ठ.क्र. ३०७ दि. २८/२/१८ अन्वये मान्यता देणेत आलेली आहे. मा. मुख्यलेखापरिक्षक यांचे अभिप्रायात नमूद केल्याप्रमाणे अ) १०५ घंटागाडीसाठी ११० वाहनचालक व ११० बिगारी ब) १२० घंटागाडीसाठी १२० वाहनचालक व १५० बिगारी बाहय यंत्रणेमार्फत पुरवठा करुन घेणेसाठी ७,८६,७८,२७०/- इतके खर्च अपेक्षित असल्याने सदरचा खर्च १४ वित्त आयोगाच्या अनुदानातील रक्कमेतून करण्यासाठी मा. सर्वसाधारण सभेची मान्यता आवश्यकता असल्याने प्रस्तुत प्रकरणी मा. सर्वसाधारण सभेची मान्यता मिळणेकामी मा. आयुक्त दिनांक १४-३-१८ चे टिपणीप्रमाणे मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासूर्ण/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.व. 25 ठ. क्र. 80
दि. 4/5/18 रोजी ठेवला खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



जिल्हा शैक्षणिक सातत्यपूर्ण व्यावसायिक विकास संस्था, वेळापूर, ता. माळशिरस, जि. सोलापूर यांच्या विज्ञान कक्ष व संसाधन कक्षासाठी मनपा मराठी मुलींची शाळा क्र. १९ या इमारतीच्या तीन वर्ग खोल्या मिळणेबाबत प्रस्तावात नमूद कारणास्तव जिल्हा शैक्षणिक सातत्यपूर्ण व्यावसायिक विकास संस्था, वेळापूर, ता. माळशिरस, जि. सोलापूर यांच्या विज्ञान कक्ष व संसाधन कक्षासाठी मनपा मराठी मुलींची शाळा क्र. १९ या इमारतीच्या तीन वर्ग खोल्या देण्याबाबत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ७९ (क) प्रमाणे सर्वसाधारण सभेची मान्यता घेण्यास सदर विज्ञान व संसाधन कक्षाचा प्रस्ताव प्रस्ताव महानगरपालिका सोलापूर सर्वसाधारण सभेत मंजूरीकरिता सादर करणेकामी मा. आयुक्त यांचे दिनांक १२-२-१८ चे टिपणीने आलेल्या प्रकरणाचे अवलोकन केले.

सदर संस्थेस मनपा मराठी मुलींची शाळा क्र. १९ या इमारतीच्या तीन वर्ग खोल्या देणेबाबत करारपत्र करुन घेऊन ३ वर्ग खोल्या तीन वर्षासाठी देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर कालावधीमध्ये या वर्गासाठी येणारे लाईटचे बिल व मेन्टेनन्सचा खर्च संपूर्णपणे सदर संस्थेने करावयाचा आहे अशी अट करारपत्रात नमूद करण्यांत यावी. दरम्यानच्या कालावधीत मा. शासनाकडून अन्य ठिकाणची जागा उपलब्ध झाल्यास सदरच्या तीन वर्ग खोल्या महानगरपालिकेस परत करणेत यावे.

तसेच खाजगी शाळेतील विद्यार्थ्यांना सुध्दा या विज्ञान व संससाधन कक्षाचा लाभ देण्याबाबत मा. शासनास विनंती करणेत यावे यांस ही मान्यता देणेत येत आहे.

(signature) P.P.
नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/चालू/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज 26.ठ. क्र......67
दि...8/5/18...रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



मूलभूत सोयी सुविधा सन २०१६-१७ या योजनेअंतर्गत **भाग-१** मधील ७ रस्ते करणेकामी ई निविदा व जाहिर प्रसिध्दीकरण करुन मुल्यनिविदा मागविले असता ४ निविदा आलेल्या असून यापैकी मक्तेदार तिरुपती कन्स्ट्रक्शन हे अपात्र ठरलेले आहेत. उर्वरीत ३ पात्र मक्तेदारापैकी मे. संजय बिल्डर्स यांचे निविदेतील मक्त्याच्या रकमेपेक्षा ९.९९ % कमी हे दर (मक्त्याची रक्कम रु. १,०७,८६,१४५/-) सर्वात कमीचे आहेत. त्यामुळे याकामी सर्वात कमीचे दराचे मक्तेदार मे. संजय बिल्डर्स यांचेकडून विषयांकित कामी त्यांनी निविदेत दिलेल्या मक्त्याच्या रक्कमेपेक्षा ९.९९ % कमी दराने काम करुन घेणेस, येणारे खर्चास, करारपत्र करुन वर्कऑर्डर देणेकामी मुं.प्रां.महा.अधिनियम १९४९ चे कलम ३५ (अ) नुसार मा. महानगरपालिकेकडे निर्णयास्तव सादर करणेकामी मा. आयुक्त यांचे दिनांक ११-४-२०१८ चे टिपणीप्रमाणे मान्यता देणेत येत आहे.

Gaikwad P.P.
नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.अ. २५ ठ. क्र. ६२
दि. २१/५/१८ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



मूलभूत सोयी सुविधा सन २०१६-१७ या योजनेअंतर्गत **भाग-२** मधील ९ रस्ते करणेकामी ई निविदा व जाहिर प्रसिध्दीकरण करुन मुल्यनिविदा मागविले असता ७ निविदा आलेल्या असून यापैकी ३ मक्तेदार अपात्र ठरलेले आहेत. उर्वरीत ४ पात्र मक्तेदारापैकी समर्थ कन्स्ट्रक्शन कंपनी यांचे निविदेतील मक्त्याच्या रकमेपेक्षा ६.९९ % कमी हे दर (मक्त्याची रक्कम रु. १,१६,२५,२५८/-) सर्वात कमीचे आहेत. त्यामुळे याकामी सर्वात कमीचे दराचे मक्तेदार समर्थ कन्स्ट्रक्शन कंपनी यांचेकडून विषयांकित कामी त्यांनी निविदेत दिलेल्या मक्त्याच्या रक्कमेपेक्षा ६.९९ % कमी दराने काम करुन घेणेस, येणारे खर्चास, करारपत्र करुन वर्कऑर्डर देणेकामी मुं.प्रां.महा.अधिनियम १९४९ चे कलम ३५ (अ) नुसार मा. महानगरपालिकेकडे निर्णयास्तव सादर करणेकामी मा. आयुक्त यांचे दिनांक ११-४-२०१८ चे टिपणीप्रमाणे मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/साधारण/विशेष सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज. २८ ठ. क्र. ६३
दि. ५/५/१८ रोजी ठेवला खालील प्रो. ठराव बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



मूलभूत सोयी सुविधा सन २०१६-१७ या योजनेअंतर्गत **भाग-३** मधील १२ रस्ते करणेकामी ई निविदा व जाहिर प्रसिध्दीकरण करुन मुल्यनिविदा मागविले असता ५ निविदा आलेल्या असून यापैकी मक्तेदार तिरुपती कन्स्ट्रक्शन हे अपात्र ठरलेले आहेत. उर्वरीत ४ पात्र मक्तेदारापैकी मे. संजय बिल्डर्स यांचे निविदेतील मक्त्याच्या रकमेपेक्षा ९.९९ % कमी हे दर (मक्त्याची रक्कम रु. १,०८,२९,८४७/-) सर्वात कमीचे आहेत. त्यामुळे याकामी सर्वात कमीचे दराचे मक्तेदार मे. संजय बिल्डर्स यांचेकडून विषयांकित कामी त्यांनी निविदेत दिलेल्या मक्त्याच्या रक्कमेपेक्षा ९.९९ % कमी दराने काम करुन घेणेस, येणारे खर्चास, करारपत्र करुन वर्कऑर्डर देणेकामी मुं.प्रां.महा.अधिनियम १९४९ चे कलम ३५ (अ) नुसार मा. महानगरपालिकेकडे निर्णयास्तव सादर करणेकामी मा. आयुक्त यांचे दिनांक ११-४-२०१८ चे टिपणीप्रमाणे मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज.२८..ठ. क्र.......६४
दि..४।५।१८....रोजी ठेवला वालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



मूलभूत सोयी सुविधा सन २०१६-१७ या योजनेअंतर्गत **भाग-४** मधील २ रस्ते करणेकामी ई निविदा व जाहिर प्रसिध्दीकरण करुन मुल्यनिविदा मागविले असता ३ निविदा आलेल्या असून ३ ही मक्तेदार पात्र ठरलेले आहेत. पात्र मक्तेदारापैकी श्री. सिध्देश्वर कन्सट्रक्शन यांचे निविदेतील मक्त्याच्या रकमेपेक्षा १५.६० % कमी हे दर (मक्त्याची रक्कम रु. १,२८,५७,३२०/-) सर्वात कमीचे आहेत. त्यामुळे याकामी सर्वात कमीचे दराचे मक्तेदार श्री. सिध्देश्वर कन्सट्रक्शन यांचेकडून विषयांकित कामी त्यांनी निविदेत दिलेल्या मक्त्याच्या रक्कमेपेक्षा १५.६०% कमी दराने काम करुन घेणेस, येणारे खर्चास, करारपत्र करुन वर्कऑर्डर देणेकामी मुं.प्रां.महा.अधिनियम १९४९ चे कलम ३५ (अ) नुसार मा. महानगरपालिकेकडे निर्णयास्तव सादर करणेकामी मा. आयुक्त यांचे दिनांक ११-४-२०१८ चे टिपणीप्रमाणे मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासुर्ती/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज. 30 ठ. क्र......64
दि...4.5.18.....रोजी ठेवला यातील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



मूलभूत सोयी सुविधा सन २०१६-१७ या योजनेअंतर्गत **भाग-५** मधील ४ रस्ते करणेकामी ई निविदा व जाहिर प्रसिध्दीकरण करुन मुल्यनिविदा मागविले असता ३ निविदा आलेल्या असून ३ ही मक्तेदार पात्र ठरलेले आहेत. पात्र मक्तेदारापैकी शांभवी कन्सट्रक्शन यांचे निविदेतील मक्त्याच्या रकमेपेक्षा १८.०१ % कमी हे दर (मक्त्याची रक्कम रु. १,०७,६२,६१३/-) सर्वात कमीचे आहेत. त्यामुळे याकामी सर्वात कमीचे दराचे मक्तेदार शांभवी कन्सट्रक्शन यांचेकडून विषयांकित कामी त्यांनी निविदेत दिलेल्या मक्त्याच्या रक्कमेपेक्षा १८.०१% कमी दराने काम करुन घेणेस, येणारे खर्चास, करारपत्र करुन वर्कऑर्डर देणेकामी मुं.प्रां.महा.अधिनियम १९४९ चे कलम ३५ (अ) नुसार मा. महानगरपालिकेकडे निर्णयास्तव सादर करणेकामी मा. आयुक्त यांचे दिनांक ११-४-२०१८ चे टिपणीप्रमाणे मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/प्रामुख्य/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.अ. 37 ठ. क्र. 66
दि. 4/5/18 रोजी ठेवला असलेला प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



मूलभूत सोयी सुविधा सन २०१६-१७ या योजनेअंतर्गत **भाग-६** मधील ९ रस्ते करणेकामी ई निविदा व जाहिर प्रसिध्दीकरण करुन मुल्यनिविदा मागविले असता ३ निविदा आलेल्या असून ३ ही मक्तेदार पात्र ठरलेले आहेत. पात्र मक्तेदारापैकी शांभवी कन्सट्रक्शन यांचे निविदेतील मक्त्याच्या रकमेपेक्षा १४.५१ % कमी हे दर (मक्त्याची रक्कम रु. १,२६,८६,४४९/-) सर्वात कमीचे आहेत. त्यामुळे याकामी सर्वात कमीचे दराचे मक्तेदार शांभवी कन्सट्रक्शन यांचेकडून विषयांकित कामी त्यांनी निविदेत दिलेल्या मक्त्याच्या रक्कमेपेक्षा १४.५१% कमी दराने काम करुन घेणेस, येणारे खर्चास, करारपत्र करुन वर्कऑर्डर देणेकामी मुं.प्रां.महा.अधिनियम १९४९ चे कलम ३५ (अ) नुसार मा. महानगरपालिकेकडे निर्णयास्तव सादर करणेकामी मा. आयुक्त यांचे दिनांक ११-४-२०१८ चे टिपणीप्रमाणे मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका.

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासुली/विशेष सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज ३२ ठ. क्र......६८ दि...४/५/१८...रोजी ठेवला वालील प्रो. ठराव बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



मूलभूत सोयी सुविधा सन २०१६-१७ या योजनेअंतर्गत **भाग-७** मधील ८ रस्ते करणेकामी ई निविदा व जाहिर प्रसिध्दीकरण करुन मुल्यनिविदा मागविले असता ३ निविदा आलेल्या असून ३ ही मक्तेदार पात्र ठरलेले आहेत. पात्र मक्तेदारापैकी श्री. सिध्देश्वर कन्सट्रक्शन यांचे निविदेतील मक्त्याच्या रकमेपेक्षा १५.७० % कमी हे दर (मक्त्याची रक्कम रु. १,३३,२६,९०५/-) सर्वात कमीचे आहेत. त्यामुळे याकामी सर्वात कमीचे दराचे मक्तेदार श्री. सिध्देश्वर कन्सट्रक्शन यांचेकडून विषयांकित कामी त्यांनी निविदेत दिलेल्या मक्त्याच्या रक्कमेपेक्षा १५.७०% कमी दराने काम करुन घेणेस, येणारे खर्चास, करारपत्र करुन वर्कऑर्डर देणेकामी मुं.प्रां.महा.अधिनियम १९४९ चे कलम ३५ (अ) नुसार मा. महानगरपालिकेकडे निर्णयास्तव सादर करणेकामी मा. आयुक्त यांचे दिनांक ११-४-२०१८ चे टिपणीप्रमाणे मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका.

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.अ 33 ठ. क्र. ६८
दि. ४/५/१८ रोजी ठेवला खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



मूलभूत सोयी सुविधा सन २०१६-१७ या योजनेअंतर्गत **भाग-८** मधील ७ रस्ते करणेकामी ई निविदा व जाहिर प्रसिध्दीकरण करुन मुल्यनिविदा मागविले असता ३ निविदा आलेल्या असून ३ ही मक्तेदार पात्र ठरलेले आहेत. पात्र मक्तेदारापैकी श्री. सिध्देश्वर कन्सट्रक्शन यांचे निविदेतील मक्त्याच्या रकमेपेक्षा १५.६० % कमी हे दर (मक्त्याची रक्कम रु. १,१९,८५,१७५/-) सर्वात कमीचे आहेत. त्यामुळे याकामी सर्वात कमीचे दराचे मक्तेदार श्री. सिध्देश्वर कन्सट्रक्शन यांचेकडून विषयांकित कामी त्यांनी निविदेत दिलेल्या मक्त्याच्या रक्कमेपेक्षा १५.६०% कमी दराने काम करुन घेणेस, येणारे खर्चास, करारपत्र करुन वर्कऑर्डर देणेकामी मुं.प्रां.महा.अधिनियम १९४९ चे कलम ३५ (अ) नुसार मा. महानगरपालिकेकडे निर्णयास्तव सादर करणेकामी मा. आयुक्त यांचे दिनांक ११-४-२०१८ चे टिपणीप्रमाणे मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासुर्ती/विशेष सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.म ३४ ठ. क्र. ५१ दि. ८/५/१८ रोजी ठेवला खालील प्रो. ठराव पूर्णपणे/तर्कनुसार पास झाला.



मूलभूत सोयी सुविधा सन २०१६-१७ या योजनेअंतर्गत **भाग-९** मधील २ रस्ते करणेकामी ई निविदा व जाहिर प्रसिध्दीकरण करुन मुल्यनिविदा मागविले असता ३ निविदा आलेल्या असून ३ ही मक्तेदार पात्र ठरलेले आहेत. पात्र मक्तेदारापैकी श्री. सिध्देश्वर कन्सट्रक्शन यांचे निविदेतील मक्त्याच्या रकमेपेक्षा १८.२५ % कमी हे दर (मक्त्याची रक्कम रु. १,३८,२२,५११/-) सर्वात कमीचे आहेत. त्यामुळे याकामी सर्वात कमीचे दराचे मक्तेदार श्री. सिध्देश्वर कन्सट्रक्शन यांचेकडून विषयांकित कामी त्यांनी निविदेत दिलेल्या मक्त्याच्या रक्कमेपेक्षा १८.२५% कमी दराने काम करुन घेणेस, येणारे खर्चास, करारपत्र करुन वर्कऑर्डर देणेकामी मुं.प्रां.महा.अधिनियम १९४९ चे कलम ३५ (अ) नुसार मा. महानगरपालिकेकडे निर्णयास्तव सादर करणेकामी मा. आयुक्त यांचे दिनांक ११-४-२०१८ चे टिपणीप्रमाणे मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/~~कायमुल्ती~~/खास
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज ३५ ठ. क्र......१००
दि...२१।५।१८....रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/~~सर्वानुमते~~ पास झाला.



मूलभूत सोयी सुविधा सन २०१६-१७ या योजनेअंतर्गत **भाग-१०** मधील ३ रस्ते करणेकामी ई निविदा व जाहिर प्रसिध्दीकरण करुन मुल्यनिविदा मागविले असता ५ निविदा आलेल्या असून ५ ही मक्तेदार पात्र ठरलेले आहेत. पात्र मक्तेदारापैकी श्री. सिध्देश्वर कन्सट्रक्शन यांचे निविदेतील मक्त्याच्या रकमेपेक्षा १८.०० % कमी हे दर (मक्त्याची रक्कम रु. १,२३,८१,४६०/-) सर्वात कमीचे आहेत. त्यामुळे याकामी सर्वात कमीचे दराचे मक्तेदार श्री. सिध्देश्वर कन्सट्रक्शन यांचेकडून विषयांकित कामी त्यांनी निविदेत दिलेल्या मक्त्याच्या रक्कमेपेक्षा १८.००% कमी दराने काम करुन घेणेस, येणारे खर्चास, करारपत्र करुन वर्कऑर्डर देणेकामी मुं.प्रां.महा.अधिनियम १९४९ चे कलम ३५ (अ) नुसार मा. महानगरपालिकेकडे निर्णयास्तव सादर करणेकामी मा. आयुक्त यांचे दिनांक ११-४-२०१८ चे टिपणीप्रमाणे मान्यता देणेत येत आहे.

Gaikwad A.P.
नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज 35 ठ. क्र. 09
दि. 8/5/18 रोजी ठेवता आलेले प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



मूलभूत सोयी सुविधा सन २०१६-१७ या योजनेअंतर्गत **भाग-११** मधील ४ रस्ते करणेकामी ई निविदा व जाहिर प्रसिध्दीकरण करुन मुल्यनिविदा मागविले असता ५ निविदा आलेल्या असून यापैकी मक्तेदार एस. डी. कलकुटगी हे अपात्र ठरलेले आहेत. उर्वरीत ४ पात्र मक्तेदारापैकी श्री. सिध्देश्वर कन्सट्रक्शन यांचे निविदेतील मक्त्याच्या रकमेपेक्षा १८.०४ % कमी हे दर (मक्त्याची रक्कम रु. १,२२,३२,६२०/-) सर्वात कमीचे आहेत. त्यामुळे याकामी सर्वात कमीचे दराचे मक्तेदार श्री. सिध्देश्वर कन्सट्रक्शन यांचेकडून विषयांकित कामी त्यांनी निविदेत दिलेल्या मक्त्याच्या रक्कमेपेक्षा १८.०४% कमी दराने काम करुन घेणेस, येणारे खर्चास, करारपत्र करुन वर्कऑर्डर देणेकामी मुं.प्रां.महा.अधिनियम १९४९ चे कलम ३५ (अ) नुसार मा. महानगरपालिकेकडे निर्णयास्तव सादर करणेकामी मा. आयुक्त यांचे दिनांक ११-४-२०१८ चे टिपणीप्रमाणे मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/खास/नियमित सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.प्र. ३५ ठ. क्र. ६२ दि. ४/५/१८ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



मूलभूत सोयी सुविधा सन २०१६-१७ या योजनेअंतर्गत **भाग-१२** मधील ८ रस्ते करणेकामी ई निविदा व जाहिर प्रसिध्दीकरण करुन मुल्यनिविदा मागविले असता १ निविदा आलेल्या असून तो मक्तेदार पात्र ठरलेला आहे. पात्र मक्तेदार समर्थ कन्स्ट्रक्शन कंपनी यांचे निविदेतील मक्त्याच्या रकमेपेक्षा १५.०० % कमी हे दर (मक्त्याची रक्कम रु. १,६८,६३,७०४/-) सर्वात कमीचे आहेत. त्यामुळे याकामी सर्वात कमीचे दराचे मक्तेदार समर्थ कन्स्ट्रक्शन कंपनी यांचेकडून विषयांकित कामी त्यांनी निविदेत दिलेल्या मक्त्याच्या रक्कमेपेक्षा १५.०० % कमी दराने काम करुन घेणेस, येणारे खर्चास, करारपत्र करुन वर्कऑर्डर देणेकामी मुं.प्रां.महा.अधिनियम १९४९ चे कलम ३५ (अ) नुसार मा. महानगरपालिकेकडे निर्णयास्तव सादर करणेकामी मा. आयुक्त यांचे दिनांक ११-४-२०१८ चे टिपणीप्रमाणे मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासुली/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.अ. ३८ ठ. क्र. ४०३
दि. ४/५/१८ रोजी ठेवला असलेला प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



मूलभूत सोयी सुविधा सन २०१६-१७ या योजनेअंतर्गत **भाग-१३** मधील ५ रस्ते करणेकामी ई निविदा व जाहिर प्रसिध्दीकरण करुन मुल्यनिविदा मागविले असता ३ निविदा आलेल्या असून ३ ही मक्तेदार पात्र ठरलेले आहेत. पात्र मक्तेदारापैकी श्री. सिध्देश्वर कन्सट्रक्शन यांचे निविदेतील मक्त्याच्या रकमेपेक्षा १८.०५ % कमी हे दर (मक्त्याची रक्कम रु. १,०१,३८,६२०/-) सर्वात कमीचे आहेत. त्यामुळे याकामी सर्वात कमीचे दराचे मक्तेदार श्री. सिध्देश्वर कन्सट्रक्शन यांचेकडून विषयांकित कामी त्यांनी निविदेत दिलेल्या मक्त्याच्या रक्कमेपेक्षा १८.०५% कमी दराने काम करुन घेणेस, येणारे खर्चास, करारपत्र करुन वर्कऑर्डर देणेकामी मुं.प्रां.महा.अधिनियम १९४९ चे कलम ३५ (अ) नुसार मा. महानगरपालिकेकडे निर्णयास्तव सादर करणेकामी मा. आयुक्त यांचे दिनांक ११-४-२०१८ चे टिपणीप्रमाणे मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/साधारण/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.जा ३९ ठ. क्र. 48
दि. 8/5/18 रोजी ठेवला खालील प्रो. ठराव
बहुमताचे/सर्वानुमते पास झाला.



मूलभूत सोयी सुविधा सन २०१६-१७ या योजनेअंतर्गत **भाग-१५** मधील प्र.क्र. ५ जुना कारंबा नाका ते बार्शी टोल नाका रस्त्यावरील पुलाचे मजबुतीकरण करणेकामी ई निविदा व जाहिर प्रसिध्दीकरण करुन मुल्यनिविदा मागविले असता ५ निविदा आलेल्या असून ५ ही मक्तेदार पात्र ठरलेले आहेत. पात्र मक्तेदारापैकी पूर्ती कन्सट्रक्शन यांचे निविदेतील मक्त्याच्या रकमेपेक्षा ०.२० % कमी हे दर (मक्त्याची रक्कम रु. १,९५,७९,५२२/-) सर्वात कमीचे आहेत. त्यामुळे याकामी सर्वात कमीचे दराचे मक्तेदार पूर्ती कन्सट्रक्शन यांचेकडून विषयांकित कामी त्यांनी निविदेत दिलेल्या मक्त्याच्या रक्कमेपेक्षा ०.२०% कमी दराने काम करुन घेणेस, येणारे खर्चास, करारपत्र करुन वर्कऑर्डर देणेकामी मुं.प्रां.महा.अधिनियम १९४९ चे कलम ३५ (अ) नुसार मा. महानगरपालिकेकडे निर्णयास्तव सादर करणेकामी मा. आयुक्त यांचे दिनांक ११-४-२०१८ चे टिपणीप्रमाणे मान्यता देणेत येत आहे.

(signature) P.P.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मामुली/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज...४०.ठ. क्र.......०५
दि...८|५|१८...रोजी ठेवला असलेला प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



मूलभूत सोयी सुविधा सन २०१६-१७ या योजनेअंतर्गत **भाग-१७** मधील प्र.क्र. १ शेळगी नाल्यावरील गुमटे वस्ती येथील पुलाचे मजबुतीकरण करणेकामी ई निविदा व जाहिर प्रसिध्दीकरण करुन मुल्यनिविदा मागविले असता ३ निविदा आलेल्या असून ३ ही मक्तेदार पात्र ठरलेले आहेत. पात्र मक्तेदारापैकी पूर्ती कन्सट्रक्शन यांचे निविदेतील मक्त्याच्या रकमेपेक्षा ५.२२ % कमी हे दर (मक्त्याची रक्कम रु. ७७,२४,२८६/-) सर्वात कमीचे आहेत. त्यामुळे याकामी सर्वात कमीचे दराचे मक्तेदार पूर्ती कन्सट्रक्शन यांचेकडून विषयांकित कामी त्यांनी निविदेत दिलेल्या मक्त्याच्या रक्कमेपेक्षा ५.२२% कमी दराने काम करुन घेणेस, येणारे खर्चास, करारपत्र करुन वर्कऑर्डर देणेकामी मुं.प्रां.महा.अधिनियम १९४९ चे कलम ३५ (अ) नुसार मा. महानगरपालिकेकडे निर्णयास्तव सादर करणेकामी मा. आयुक्त यांचे दिनांक ११-४-२०१८ चे टिपणीप्रमाणे मान्यता देणेत येत आहे.

Gurkhale P.P.
नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मामुली/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.जा.९८३.ठ. क्र......७६
दि..११/५/१८.....रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.

१८३

स्थानिक संस्था कर कार्यालयातील असेसमेंटच्या अधिकार प्रदानासंबंधी प्रकरणातील पत्रानुसार मा.म.न.पा. ठराव करुन दि.२९.१०.२०१४ व दि.१०.१०.२०१६ ने अधिकार प्रदान करण्यात आलेले आदेश काय होते ? याबाबत संपूर्ण प्रकरणासह माहिती फेर सादर करणेस मा. सर्वसाधारण सभेने दिनांक ९-१-२०१८ रोजीच्या सभेत मान्यता देणेत आले होते. त्याप्रमाणे प्रकरणासोबत असलेल्या जा.क्र.नआ/वै/२२०/दि.२९.१०.२०१४ च्या आदेशान्वये प्रशासकीय कामकाजाच्या सुकरतेच्या दृष्टीकोनातून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे विहित कलमाव्दारे मा.आयुक्त यांना प्राप्त असलेले अधिकार अधिनियमातील कलम ६९ (१) अन्वये मा.अतिरिक्त आयुक्त, मा.उपायुक्त, मुख्य आयातकर निरिक्षक व आयतकर निरिक्षक या सेवकांना प्रकरणी असलेल्या आदेशान्वये अटी व नियमानुसार अधिकार प्रदान करण्यात अलेले आहेत. तसेच कलम १५२(E) (२) अन्वये एल.बी.टी. बाबत विशेष अधिकार सोपविणेबाबतही मा.आयुक्तांना अधिकार बहाल करण्यात आले आहेत. अधिकार प्रदानाबाबतचे आदेशाची प्रत प्रकरणासोबत जोडलेली आहे. यासंबंधी सदरची माहिती मा.म.न.पा. सभेपुढे माहितीस्तव सादर करणेस मा.आयुक्त यांचे कडून दि.०९.०२.१८ टिपणीने आलेल्या प्रकरणाची माहिती घेतली.

Gurhede P.P.
नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मामुली/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज १८४ ठ. क्र. [illegible]
दि. ११/५/१८ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



२० डिसेंबर २०१७ दि अर्बन युनियन डेलिगेशन टू इंडिया,या संस्थेकडून मा.महापौर यांचे नांवे
Henriette Faergenann First Counsellor Environment Energy, Climate Change
यांचेकडून सोलापूर शहराची भारतातील १२ शहरातून निवड झाल्याचे पत्र प्राप्त झालेले आहे. तदनंतर
International Urban Co-operation/India Pier Roberto Remitti - Program Director
यांनी दि. २१-२-२०१८ रोजी मा.महापौर,व मा.आयुक्त यांना सोलापूर शहरासमवेत स्पेन देशातील Murcia या
शहरासमवेत स्मार्ट सिटी अंतर्गत नागरी सुविधा शहरी नाविन्यपुर्ण सुविधा करण्यासंबंधात त्यांनी रुचि दाखविली
असून, त्याकरिता सोलापूर महानगरपालिका व स्पेन देशातील Murcia या शहरासमवेत सामंजस्य करार
(MOU) करणेकरिता ई- मेल वर कळविले आहे .त्या अनुषंगाने मा.आयुक्त यांना दि. २१ फेब्रुवारी २०१८
रोजी आम्ही MOU करणेस तयार असलेबाबत इमेल द्वारे कळविले आहे. त्यांचेकडून ड्राफ्ट ॲग्रीमेंट मागविला
आहे. सदरचा ड्राफ्ट ॲग्रीमेंट महानगरपालिकेस प्राप्त झाला असून त्याप्रमाणे सामंजस्य करारपत्र करण्यास
मा.म.न.पा.सर्वसाधारण सभेची मान्यता मिळणेकामी मा.आयुक्त यांचे दि. ८-३-२०१८ चे टिपणीप्रमाणे मान्यता
देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका.

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मामुली/विशेष सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.जा.१८५ ठ. क्र. ८८ दि. ११/५/१८ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



सोलापूर प्र.क्र. ११ मध्ये अभिषेक नगर येथील घायाळ दुकानासमोरील चौकास **बजरंग चौक** असे नांव देण्यास व नामफलक लावण्यास येणा-या खर्चास मान्यता देणेस्तव आलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले.

मा. नामाभिदान समितीकडे पाठविणेस मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मामुली/विशेष सर्व साधारण सभेपुढे विषय क्र. ज१८६ ठ. क्र. ......[illegible]
दि. ११/५/१५ ..... रोजी ठेवता खालील प्रो. ठराव बहुमताने/सर्वानुमते पास झाला.

१८६

प्र.क्र. २० मधील मरहबा हॉल ते नई जिंदगी चौक ते मौलाना आझाद चौक ते सिध्देश्वर गांधी नगर ते अमीन पिठाची गिरणी पर्यंत व ललिता नगर हनुमान मंदिर ते मेन रोड चिंता कारखान्यापर्यंत एल आकाराचे रस्त्याचे डांबरीकरण किंवा कॉंक्रीटीकरण करण्यात यावेत. सदरचे दोनही रस्ते अत्यंत खराब झालेले असून, त्यामुळे नागरिकांना रहदारीस अडथळा होत आहे. या रस्त्यावर जड वाहतूक मोठया प्रमाणात असल्याने अपघात होण्याची शक्यताही नाकारता येत नाही. या बाबींचा विचार करता सदरचे दोन्हीही रस्ते डांबरीकरण अथवा कॉंक्रीटीकरण करणे कामाचे प्लॅन व एस्टीमेट करुन या रस्त्यांचे कामासाठी निधी उपलब्ध करुन देऊन सत्वर कार्यवाही करणेस मान्यता देणेस्तव आलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले.

मा. आयुक्त यांनी अभिप्राय द्यावा.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मामुली/विशेष सर्व साधारण सभेपुढे विषय क्र. जा.१८८ ठ. क्र. ८० दि. ११/५/१८ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



पंढरपूर नगरपालिका संचलित लोकमान्य विद्यालय, पंढरपूर येथील सहशिक्षक श्री. मालोजी बापूसाहेब भोसले यांची सोमनपा संचलित माध्यमिक प्रशालेकडे बदलीने नियुक्ती होणेबाबत प्रस्तावात नमूद कारणास्तव व प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे श्री. मालोजी बापूसाहेब भोसले, सहा. शिक्षक हे पंढरपूर नगरपालिका संचलित लोकमान्य विद्यालय, पंढरपूर येथे कार्यरत असून, त्यांनी पंढरपूर नगरपालिकेकडील प्रशासकीय कार्यवाही पूर्ण करुन बदलीने मनपा प्रशालेमध्ये नियुक्ती होणेबाबत केलेल्या अर्जास अनुसरुन मा. आयुक्त यांचेकडे प्रस्ताव सादर केला असता माननियांनी मा. सर्वसाधारण सभेची मान्यता घेण्यात यावी असे आदेश दिलेले आहेत. सदरचे आदेशाप्रमाणे मा. सर्वसाधारण सभेपुढे सादर करणेकामी मा. उपायुक्त यांचे दि. २५-१-१८ चे टिपणीने आलेल्या प्रकरणाचे अवलोकन केले.

मा.राज्य शासनाच्या जी.आर.चे अवलोकन करता त्याअनुशंगाने श्री.भोसले यांनी केलेली मागणी ही पूर्णपणे असंबंध असल्याने त्यांचा अर्ज नामंजुर करण्यात येत आहे.

Sd/- P.P.

नगर सचिव

सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष सर्वसाधारण सभेपुढे विषय क्र.न. १८८ ठ. क्र. ८१ दि. ११/५/१८ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



सोलापूर प्रभाग क्रं १३ मधील दिवंगत नेते तथा समाजसेवक पैंगबर वासी अ. कय्युम हाजी मौलाना बु-हाण हे आयुष्यभर सामाजिक कार्य केले समाजातील तरुणांना सत्कार्य करण्याची प्रेरणा दिले आपल्या कार्यातून आदर्श निर्माण केले. यांची प्रेरणा नव्या पिढीला मिळावी म्हणून प्रभाग १३ मधील गुडलक हार्डवेअर ते लिंबोळे वाडा ६०३ न्यु पाच्छा पेठ अंजुमन मोहल्ला या मार्गास **पैंगबरवासी अ. कय्युम हाजी मौलाना बु-हाण मार्ग** असे नाव देणेस मान्यता देणेस्तव आलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले.

मा. नामाभिदान समितीकडे पाठविणेस मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.अ. ३८९ ठ. क्र. ८२ दि. ११/५/१८ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव एकमताने/सर्वानुमते पास झाला.



दरवर्षी मा. महाराष्ट्र शासनातर्फे दिल्या जाणा-या शिवछत्रपती पुरस्कार यंदाही सोलापूर शहरातील व जिल्हयातील अनेक नामवंत आंतरराष्ट्रीय खेळांडूंना विविध प्रकारच्या क्रिडा प्रकारात नैपुण्य मिळविल्यामुळे खालील प्रमाणे खेळाडूंना वरील पुरस्कार देण्यात आलेला आहे. १) श्रीकांत ढेपे-क्रिडा संघटक, २) सुयश जाधव ( जलतरण ऋतिका श्रीराम (डायव्हिंग) नारायण जाधव (जलतरण प्रशिक्षक) प्रार्थना ठोंबरे (लॉन टेनिस) वसंत सरवदे (कुस्ती) यांनी त्यांच्या क्रिडा क्षेत्रात विशेष प्राविण्य मिळविल्यामुळे व शिवछत्रपती पुरस्कार मिळाल्यामुळे सोलापूर शहराचा गौरव संपुर्ण देशात झालेला आहे. यामुळे सोलापूर महानगरपालिकेच्या वतीने वरील खेळाडूंचा विशष अभिनंदन करीत असून, त्यांचा यथोचित गौरव करुन स्मृतीचिन्ह देऊन नागरी सत्कार करणे, स्मृती चिन्ह बनविणेस व याकामी येणारे खर्चास, तसेच पुढील योग्य ती कार्यवाही सत्वर करणेस मान्यता देणेत येत आहे.

तसेच शिवछत्रपती पुरस्कार मिळालेल्या सर्व क्रिडापटूंचा व सोलापूर शहरातील ज्या खेळाडूंची राष्ट्रीय स्पर्धेत निवड झालेली आहे. अशा सर्व खेळाडूंचा यथोचित गौरव करुन स्मृतीचिन्ह देऊन नागरी सत्कार करणे याकामी येणा-या खर्चासह मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज १६० ठ. क्र. ८३
दि. ११/५/९८ रोजी ठेवला खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



प्रस्ताव पूर्वसूचना देण्या-या सभासदाने अथवा त्याच्या अनुमोदकाने मांडला नसल्यामुळे सदरचा प्रस्ताव वगळणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

नागपूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष 48
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज 9/4-29 ठ. क्र. ......
दि. 29/5/18 ...... रोजी ठेवला असलेला प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



अर्धवेळ कंत्राटी पध्दतीने कार्यरत असलेल्या वाहन चालक व बिगारी व आर.सी. वाहनावरील सेवक यांच्या
किमान वेतन कायद्याप्रमाणे वेतनाबाबत मा. स्थायी समितीच्या ठराव क्र. १९२, दिनांक ८-१२-२०१७ नुसार सविस्तर
माहिती तयार करण्यात आली असून, प्रकरण मा. समितीकडे फेर सादर करण्यास नमूद होते. तथापि, मा. स्थायी
समिती निवड प्रक्रिया मा. उच्च न्यायालयामध्ये प्रलंबित असल्याने महाराष्ट्र महानगरपालिका कलम ३५-अ अन्वये सदर
प्रकरण मा. सर्वसाधारण सभेपुढे ठेवणेत येत आहे. त्याकरिता खाली नमूद केल्याप्रमाणे मसुदा असे.

म.न.पा.कडील अर्धवेळ कंत्राटी पध्दतीने घंटागाडीवर काम करणा-या वाहन चालक, बिगारी यांच्या
मानधनावरील किमान वेतन कायद्याप्रमाणे वेतन आदा करणेकामी मा. मुख्यलेखापरिक्षक यांचे दि. २६-९-२०१७ रोजीचे
नमूद बाबीच्या पूर्ततेअंती जानेवारी २०१५ पासून आजतागायत २३६ कामगाराची नियुक्ती ही कलम ६७ (३) क अन्वये
असलेले अधिनियमातील तरतूदीनुसार सदरची बाब मा. स्थायी समितीपुढे माहितीस्तव सादर करणेस व तसेच १ ते १०
बाबी धोरणात्मक मान्यतेसाठी व मुख्यलेखापरिक्षक यांचे दि. ३-१०-२०१७ चे टिपणीत नमूद १ ते ४ बाबीसह मा. स्थायी
समिती मार्फत सदरचा प्रस्ताव मा. सर्वसाधारण सभेपुढे सादर करणेकामी आलेल्या प्रकरणाचे अवलोकन केले.

**मुद्दा :- १)** ठराव क्र. १९२, दि. ८-१२-२०१७ मध्ये नमूद केल्यानुसार घंटागाडीवर वाहन चालक ८८ असून त्यापैकी
हजन ८१ व ७ गैरहजर तसेच एकूण घंटागाडी बिगारी ११८ असून १०३ हजर व १५ गैरहजर आहेत.

**मुद्दा :- २)** आरोग्य खात्याकडील दि. ६-४-१९९५ पूर्वीचे व दि. ६-४-१९९५ नंतरचे बिगारी व झाडूवाले आणि
त्याचप्रमाणे इतर विभागातील मजूर रोजंदारी कामगारांना किमान वेतन देता येईल किंवा कसे याबाबत विधान सल्लागार
यांनी दिलेल्या अभिप्रायानुसार किमान वेतन अधिनियम १९४८ नुसार रोजंदारी कर्मचा-यांना देखील किमान वेतन
देणेबाबत म.न.पा.ची आर्थिक परिस्थिती पाहून निर्णय घेणे बाबत विधान सल्लागार यांनी दिलेल्या अभिप्रायाचे
अवलोकन केले.

**मुद्दा क्र. ३)** तसेच दि. १५-८-२०१७ रोजी मा. महापौर यांनी सर्व कामगारांना किमान वेतनाची घोषणा केली व त्यास
मा. स्थायी समितीने मान्यता दिलेली आहे. त्याबाबतचा ठराव तसेच जे सेवक दि. १-६-२०१७ पासून अर्धवेळ ऐवजी
पूर्णवेळ काम करीत होते. त्यांना पूर्णवेळ कामाचे वेतन देणे आवश्यक असलेबाबत मा. आयुक्त यांच्या दि. १२-२-
२०१८ च्या आदेशाचे अवलोकन केले. व या सर्व कर्मचा-यांना/Supervisors यांना किमान वेतन देणे आवश्यक
आहे. यापूर्वी आदा केलेले वेतन वजा करुन उर्वरीत रक्कम देणे उचित होईल आऊट सोर्सिंगद्वारे सेवक उपलब्ध
झाल्यानंतर यापूर्वी केलेल्या तातपुरत्या नियुक्ती नियमाप्रमाणे संपुष्टात आणणे आवश्यक राहीत असे नमूद केले.

प्रकरण सदरची बाब मा. सर्वसाधारण सभेपुढे धोरणात्मक मान्यतेस्तव सादर करणेकामी तसेच सदर विषय
अनेक दिवसापासून प्रलंबित आहे. या कर्मचा-यांनी वेळोवेळी यासाठी आंदोलनही केले आहेत. त्यामुळे तातडीचे प्रस्ताव
मान्यतेसाठी सादर करणेकामी मा. आयुक्त यांचे दिनांक १८-४-२०१८ चे टिपणीस प्रस्तावितप्रमाणेस मान्यता देणेत
येत आहे.

वर नमूद मुद्दा क्र.२ :- किमान वेतन अधिनियमानुसार वेतन अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.
मुद्दा क्र. ३ :- टिपणीत नमूद प्रमाणे आऊटसोर्सिंगद्वारे सेवक उपलब्ध झाल्यानंतर सदर कंत्राटी कर्मचा-यांची
कायदेशीर मार्गाचा अवलंब करुन पुढील कार्यवाही करणेत यावी.
रोजंदारी सेवकाबाबतचा प्रस्ताव अलाहिदा महानगरपालिकेकडे सादर करणेस मान्यता देणेत येत आहे.

(सही)
नगर सचिव
नागपूर महानगरपालिका

[illegible]लापूर महानगरपालिकच्या तहकूब/मासिक/[illegible]
सर्व साधारण सभेपुढे [illegible] क्र.ज तात-२/२२ ठ. क्र.......
दि. ११/५/१८ ......रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.

तात-२/२२

१४ वे वित्त आयोग (घनकचरा व्यवस्थापन) अंतर्गत प्राप्त अनुदानातून कामे प्रस्तावित करणेबाबत प्रस्तावात नमूद कारणास्तव व प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६३ मध्ये नमूद केलेल्या आवश्यक कर्तव्याकरिता खर्च करणे प्रस्तावात नमूद अटीच्या अधिन राहून अनुज्ञेय राहील. प्रस्तावात नमूद अ, ब, क व ड मध्ये नमूद कामे शासन निर्णयानुसार १४ व्या वित्त आयोगातून हाती घ्यावयाची आहेत. प्रस्तुत प्रकरणी सदर र.रु. ४८,५६,०१,५६७/- इतक्या रक्कमेचा विनियोग घनकचरा व्यवस्थापन विभागाकडून कामाकरिता करावयाचा असून, प्रस्तावा सोबत तक्त्यात नमूद केल्याप्रमाणे घनकचरा व्यवस्थापन विभागाकडील कामाकरिता निधी निश्चिम करणेत आलेला आहे. प्रस्तावित कामास मा.मनपा सभेने मान्यता दिल्यानंतर बजेट अभिप्राय घेऊन त्याप्रमाणे पुढील पूर्वगणनपत्रके तयार करुन तांत्रिक मान्यतेनंतर मा. आयुक्त यांची प्रशासकीय मंजूरी घेऊन पुढील कार्यवाही ठेवता येणार आहे. १४ व्या वित्त आयोगातील उपलब्ध अनुदान (५० टक्के) घनकचरा व्यवस्थापन तसेच वृक्षलागवडीसाठी खर्च करणे बंधनकारक आहे. त्याबाबत केलेल्या नियोजनास तातडीने देण्याबाबत मा. स.सा.सभेकडे सादर करणेबाबत मा.आयुक्त यांचे दिनांक १९-४-१८ चे टिपणीस प्रस्तावितप्रमाणेस मान्यता देणेत येत आहे.

[illegible]

नगर सचिव
[illegible]लापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मामुली/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ता.म-३/२३ ठ. क्र. ६४
दि. ११/५/१८ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.

तात-३/२३

सोलापूर शहरामध्ये २१ सप्टेंबर २०१६ रोजी मराठा समाजाचा विविध मागण्यासाठी भव्य लाखो लोकांचा महा मूकमोर्चा निघाला होता. या मराठा समाजाच्या महा मूकमोर्चामध्ये सोलापूरातील विविध सर्व जाती धर्मातील लोकांनी सुध्दा पाठींबा दिला व महामुक मोर्चामध्ये सहभाग नोंदविला होता. मराठा समाजाच्या विविध मागण्यापैकी आरक्षण ही एक मागणी असून. महाराष्ट्रातील मराठा समाजाची सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक स्थिती अत्यंत हलाखीची असून, त्याच्या एकंदरीत प्रगतीसाठी आरक्षणाची नितांत आवश्यकता आहे. तरी मराठा समाजाच्या आरक्षणाच्या मागणीनुसार मराठा समाजाकरिता आरक्षण ठेवणेकामी ही सभा मा. महाराष्ट्र शासनास व राज्य मागासवर्ग आयोग यांना विनंती करणेस मान्यता देणेस्तव आलेला प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

M·MC-6420180001 6599

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मामुली/विशेष सर्व साधारण सभेपुढे विषय क्र. ८९.ठ. क्र. ..... ५०
दि. २५।५।१९८...रोजी ठेवला खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



सोलापूर शहरामध्ये महानगरपालिकेच्या मालकीच्या इले. पोल व इमारती वरील वायर्स करिता भाडे आकारणी करणेबाबत प्रस्तावात नमूद कारणास्तव शहरात सध्याला म.न.पा.चे २३९९ पोल आहेत व यामध्ये वाढ होणार आहे. यामध्ये MSRDC व म.न.पा.चे नगरोत्थानचे पोलचा समावेश आहे. त्या अनुषंगाने सध्याचे अस्तित्वात असलेले पोल व भविष्यात वाढ होणारे पोल यावरुन वायर गेल्यास प्रति पोल/प्रति वायर/प्रति दिवस १/- रु. व इमारती वरुन गेल्या प्रति इमारत/प्रति वायर/प्रति दिवस १० रु. याप्रमाणे प्रायोगिक तत्वावर आकारणी करणेस व याबाबत संबंधित ऑपरेटर यांनी टाळाटाळ केल्यास पाचपट दंड आकारणी करणेस व योग्य ती नियमावली करणेस मा. आयुक्त यांना अधिकार देणेस मा. सर्वसाधारण सभेची मान्यता मिळणेकामी मा. आयुक्त यांचे दिनांक २०-३-१८ चे टिपणीप्रमाणे मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

M. NO. 642018000 1680 1

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मानुकी/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज. 42 ठ. क्र........55
दि. 24.5.18...रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
एकमताने/बहुमताने पास झाला.



मा.आयुक्त यांचे दिनांक २२-२-२०१८ चे टिपणीने आलेल्या प्रकरणातील कामाला प्रशासकीय मंजूरी देण्यात येत आहे.

संपूर्ण प्रकरणात खात्याकडून करण्यात आलेल्या कार्यवाहीमध्ये पूर्णपणे विसंगती दिसून येत आहे. मा.मुख्यलेखापरिक्षक यांनी प्रशासकीय मान्यतेविषयी सूचविले असताना खात्याने पूर्वगणनपत्रकास मंजूरीसाठी विषय पाठविलेला आहे. त्याच प्रकरणात सदर कामाबाबतच्या टेंडरची कागदपत्रे असून त्यासाठी वेगळी कार्यवाही करणार काय ? हे समजून येत नाही तसेच या संपूर्ण टेंडर प्रक्रियेमध्ये निविदा उघडण्याचा दिनांक ३०-१०-२०१७ असताना खात्याच्या अधिका-याने दि.२५-१०-२०१७ रोजीच मक्तेदाराकडून परफॉर्मन्स सिक्युरिटी रक्कम रुपये २,५१,०००/- चा चेक निविदा उघडण्याच्या दिनांकच्या पाच दिवस अगोदर घेतल्याचे प्रथमदर्शनी स्पष्ट होते. त्यामुळे सदर प्रकरणामध्ये संबंधीत खात्याचे अधिकारी व मक्तेदार यांच्यात असलेल्या संगनमताने हे प्रकरण तयार केल्याचे स्पष्टपणे दिसून येते.

सबब सदर कामाची मुल्यनिविदा रद्द करण्यात येत असून अल्प मुदतीच्या जाहिर प्रसिध्दीकरणाने फेर मुल्यनिविदा मागविण्यात याव्यात व प्रकरणाची चौकशी करुन संबंधीतांवर कारवाई करणेत यावी तसेच ड्रेनेज विभागाचा कार्यभार स्वतंत्रपणे देणेत यावा.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

M.MU-GU201800016603

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मामुली/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.अ ४..३..ठ. क्र.........५९
दि.२४.५.१८..रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



वैशिष्टपूर्ण योजने अंतर्गत सोलापूर महानगरपालिकेस मुलभूत सोयी सुविधांच्या विकासाकरिता र.रु. ९.३५ कोटीचे अनुदान कामांच्या यादीनुसार मंजूर करण्यात आलेले आहे. शासन निर्णयाच्या मार्गदर्शक सुचनेनुसार र.रु. ९.३५ कोटी अनुदानाइतकीच कामे महानगरपालिकेने करावयाची आहेत. त्यानुसार सदरचा विषय मा.सर्वसाधारण सभेपुढे ठेवून मनपा हिस्स्यातून घ्यावयाची कामे अंतीम केलेली आहेत. मनपा हिस्स्यापोटी सोलापूर महापालिकेस १४ व्या वित्त आयोगा अंतर्गत निधी उपलब्ध करुन देण्यात आलेल्या अनुदानातून र.रु. ९.३५ कोटी ५० टक्के मनपा हिस्स्यातून रक्कम उपलब्ध करुन देणेकामी मा. सर्वसाधारण सभा ठराव क्र. २५०, दि. १९-११-२०१५ ने मान्यता दिलेली आहे. त्यानुसार सन २०१५-१६ वैशिष्टयपूर्ण योजने अंतर्गत महानगरपालिका क्षेत्रात मुलभूत सोई सुविधांच्या विकास कामाकरिता विशेष अनुदान अंतर्गत प्र.क्र. ९ झंवर मळा जुना कारंबा नाका ते समर्थ हॉटेल येथे ड्रेनेज लाईन टाकणे कामाचे जाहिर प्रसिध्दीकरणाने निविदा मागवून मक्तेदार निश्चित करुन त्यास कामाचे आदेश देवून काम सुरु करावयाच्या असताना सदर काम सोलापूर हैद्राबाद या राष्ट्रीय महामार्गाच्या सर्व्हीस रोडमधून करावयाचे असताना राष्ट्रीय महामार्ग कार्यालयाकडून त्यांच्या सर्व्हीस रोडवर तसेच महामार्गाच्या खालील बोगद्यातून करण्यास परवानगी न मिंळाल्याने तसेच सदर कामाऐवजी भगवती सोसायटी ते प्रभाकर सोसायटी येथे ड्रेनेज लाईन टाकणे असे काम करावे असे त्या भागातील नगरसेवकांनी सुचविल्यानुसार कामाच्या जागेतील बदलास मा. त्रिसदस्यीय समितीची मंजूरी मिळणेस्तव मा. जिल्हाधिकारी यांचेकडे दि. १-११-२०१७ ने प्रस्ताव सादर केला असता मा. जिल्हाधिकारी यांनी कामाच्या जागेतील बदलास मंजूरी देता येत नाही असे दि. १-१-२०१८ च्या पत्रानुसार कळविले आहे. त्यानंतर मा. पालक मंत्री यांनी दि. ३-२-२०१८ रोजी सदरचे काम डुमणे नगर बाळे येथे करावे असे पत्र दिले आहे. त्यानुसार डुमणे नगर बाळे येथे ड्रेनेज लाईन टाकणे कामाचे पूर्वगणनत्रक क्र. १५/२०१८-१९ र.रु. १४३८८३०/- चे तयार करुन त्यास तांत्रिक मंजूरी प्रदान करुन मा. सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव तसेच जागा बदलाच्या प्रस्तावास मा. त्रिसदस्यीय समितीची मान्यता मिळणेस्तव प्रकरण मा. जिल्हाधिकारी यांचेकडे सादर करण्यांस सन २०१५-१६ वैशिष्टपूर्ण योजने अंतर्गत महानगरपालिका क्षेत्रात मुलभूत सोयी सुविधांच्या विकास कामाकरिता विशेष अनुदान अंतर्गत प्र.क्र. ९ झंवर मळा जुना कारंबा नाका ते समर्थ हॉटेल येथे ड्रेनेज लाईन टाकणे ऐवजी जागा बदलून मा. पालकमंत्री यांनी सुचविल्यानुसार डुमणे नगर बाळे येथे ड्रेनेज लाईन टाकणे या कामाचे पूर्वगणनपत्रक क्र. १५ २०१८-१९ र.रु. १४३८८३०/- यांस मा. सर्वसाधारण सभेची मान्यता मिळणेकामी मा. आयुक्त यांचे दि. २१-४-२०१८ चे टिपणीप्रमाणे मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव

सोलापूर महानगरपालिका

M.NO.GA2018000166O4

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.अ..४४..ठ.क........९० दि..२५।५।१८..रोजी ठेवता आलेला प्रो. ठराव एकमताने/बहुमताने पास झाला.



दिनदयाळ अंत्योदय योजना राष्ट्रीय उपजिविका अभियान अंतर्गत कुष्ठरुग्ण बेघरांना निवारा सुविधा देणेबाबत ई निविदा व जाहिर प्रसिध्दीकरण करुन मुल्यनिविदा मागविले असता ३ निविदा आलेल्या असून ३ ही मक्तेदार पात्र ठरलेले आहेत. पात्र मक्तेदारापैकी मे. गायत्री कन्स्ट्रक्शन यांचे निविदेतील मक्त्याच्या रकमेपेक्षा ५.११ % कमीचे हे दर (मक्त्याची र.रुपये १,५३,६९,८८९/-) सर्वात कमीचे आहेत. त्यामुळे याकामी सर्वात कमी दराचे मक्तेदार मे. गायत्री कन्स्ट्रक्शन यांचेकडून विषयांकित कामी त्यांनी निविदेत दिलेल्या मक्त्याच्या रक्कमेपेक्षा ५.११ % कमी दराने काम करुन घेणेस, येणारे खर्चास, करारपत्र करुन वर्कऑर्डर देणेकामी मुं.प्रां.महा.अधिनियम १९४९ चे कलम ३५ (अ) नुसार मा. महानगरपालिकेकडे निर्णयास्तव सादर करणेकामी मा. आयुक्त यांचे दिनांक १८-५-२०१८ चे टिपणीप्रमाणे मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

M.NO. 6420180016605

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/सामुली/विशेष सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.न. ४५ ठ. क्र. ........९९ दि. २४.५.१८........रोजी ठेवता खालील प्रो. ठराव एकमताने/सर्वानुमते पास झाला.



श्री. विनायक संजय बेळमकर वय वर्षे २० आर्चिड कॉलेज येथे बी.इ. शिक्षण घेत असून, त्यांची बहीण कु. वैष्णवी संजय बेळमकर बी.एस.सी. पहिल्या वर्षाला दयानंद कॉलेज येथे शिक्षण घेत असून, हे दोन्ही मुले सध्या जोडभावी पेठ, पोलीस चौक शेजारी सोलापूर येथे रहात आहेत. त्यांचे वडील कै. संजय विठ्ठल बेळमकर यांचे नोव्हेंबर २००८ मध्ये निधन झाले. त्यानंतर त्यांचे मातोश्री श्रीमती तनुजा संजय बेळमकर हे घरगुती कपडे शिलाई व्यवसाय करुन कुटूंबियांचा उदरनिर्वाह करीत होत्या. त्यांचेही ३१ जुलै २०१७ रोजी आकस्मिक निधन झाले. त्यामुळे ही दोन्ही मुले बेघर झालेले असून, त्यांना उत्पन्नाचे कोणतेही साधन नाही. तरी वरील दोघांना सध्या शिक्षणासाठी व उदरनिर्वाहासाठी आर्थिक मदतीची अत्यंत आवश्यकता असल्याने, महानगरपालिकेच्या वतीने जास्तीत जास्त आर्थिक मदत देण्यास मान्यता देणेस्तव आलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले.

मा. महापौर यांना अधिकार देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

M.64 2018 000 16606
29/5/18

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.न. ...... ठ. क्र. ......82
दि. 25/5/18 ...रोजी ठेवला असता प्रो. ठराव बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



सोलापूर महानगरपालिका परिवहन कर्मचारी श्री. रमेश जालींदर आवताडे (मेकॅनिक) यांची कन्या कु. तृप्ती रमेश आवताडे ही आंतरराष्ट्रीय योगासन खेळाडू असून, हिने आजवर आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय, राज्यस्तरीय, विभागीय, जिल्हास्तरीय व शहरस्तरीय विविध स्पर्धामध्ये चमकदार कामगिरी करुन चार सुवर्ण पदक, चार रौप्य पदक व पाच कास्य पदकावर आपले नाव कोरलेले आहे. याशिवाय तिला विविध सन्मानचिन्हाने व पुरस्काराने गौरविण्यात आलेले आहे. नुकत्याच अर्जेंटीना (दक्षिण अमेरीका) येथे पार पडलेल्या २६ व्या जागतिक योगासन स्पर्धेत तृप्ती आवताडे हिने भारताचे प्रतिनिधीत्व करताना वैयक्तीक आसन प्रकारात सुवर्ण पदक व वैयक्तीक आर्टिस्टीक स्पर्धेत रौप्य पदक पटकाविले आहे. तृप्तीच्या या यशाने सोलापूरच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला गेला आहे. तृप्ती आवताडे हिचा यथोचित सन्मान करावा व तिच्या कुटूंबाची आर्थिक परिस्थिती हालाखिची असल्याने तिला जास्तीत जास्त आर्थिक मदत देणेस आलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले.

मा. महापौर यांना अधिकार देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

M.NO. 64201800016608

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मामुली/विशेष सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज. ४१ठ. क्र. ९३ दि. २४/५/१९ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव बहुमताने/सर्वानुमते पास झाला.

४७

सोलापूर शहरातील कर्णिक नगर परिसरात सोलापूर महानगरपालिकेच्या मालकीची चिल्ड्रन पार्क आहे. त्याला **जगत्ज्योती महात्मा बसवेश्वर चिल्ड्रन पार्क** असे नामकरण करणेस, नामफलक लावणेस व याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता देणेस्तव आलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले.

मा. नामाभिदान समितीकडे पाठविणेस मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

M. NO. 64201800016611

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/सामुलो/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज. ४८ ठ. क्र. ९८
दि. २५/५/१८ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



सोलापूर शहरात बुधवार दिनांक १६-५-२०१८ रोजीच्या वादळीवाऱ्याने व मुसळधार पावसाने संपूर्ण शहराला झोडपले होते. या आहाकारात श्री.रफिक अ.रहीमान शेख राहणार, ६४, मुमताज नगर, जुना कुंभारी नाका, सोलापूर यांच्या घराच्या तीन खोल्यांवरील पत्रे, लोखंडी अँगलसहीत उडून गेले. त्यामध्ये त्यांचे घरातील जीवनाश्यक वस्तू, अन्नधान्य व संसारोपयोगी साहित्याचे नुकसान झाले आहे. त्यांचा संसार उघड्यावर पडला आहे. तरी त्यांना सोलापूर महानगरपालिकेच्या वतीने जास्तीत जास्त आर्थिक मदत देणेस आलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले.

मा. महापौर यांना अधिकार देणेत येत आहे.

P.P.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

M.NO. 642018000166 12

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मामुली/विशेष सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज. ४९/५४ क्र. ........ ९५ दि. २५/५/१९८ ...... रोजी ठेवता खालील प्रो. ठराव बहुमताने/सर्वानुमते पास झाला.

४९/५४

**विषय क्र. ४९ व ५४ एकत्रित करुन खालीलप्रमाणे निर्णय घेणेत येत आहे.**

दिनांक १६-५-२०१८ रोजीच्या वादळीवाऱ्यासह आलेल्या अवकाळी पावसाने शहर आणि परिसराला झोडपून काढले. वादळी पावसाचे हे तांडव ४५ मिनिटे घोंगावत होते. या आहाकारात साखर पेठ विहिरीजवळ लाकडी माळवद कोसळून आजी-आजोबांकडे आलेल्या दिव्या दयानंद गजेली ही दहा वर्षाची मुलगी गंभीर जखमी होऊन मृत्यूमुखी पडली. ती श्राविका शाळेत इयत्ता पाचवी मध्ये शिकत होती. कु. दिव्या हिच्या दु:खद निधनाने दयानंद गजेली परिवारावर दु:खाचा डोंगर कोसळलेला आहे. तरी त्यांना सहानुभूतीपूर्वक मदतीचा हात देणेसाठी सोलापूर महानगरपालिकेच्या वतीने जास्तीत जास्त आर्थिक मदत देणेस आलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले.

मा. महापौर यांना अधिकार देणेत येत आहे.

[signature] P.P.

नगर सचिव

सोलापूर महानगरपालिका.

M.NO. 64 201800016613

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मामुली/विशेष सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज. ५०८ क्र. ९६ दि. २१/५/१९ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव बहुमताने/सर्वानुमते पास झाला.

५०

दयानंद कॉलेज जवळ प्रियांका चौकातून श्रीशैलनगरकडे जाणा-या रस्त्याला **रामजाने मार्ग** असे नामकरण करणेस व सदर ठिकाणी नामफलक तयार करुन लावणेस व याकामी येणा-या खर्चास मान्यता देणेस्तव आलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले.

सदर चौकास व मार्गास स्व. माजी खासदार लिंगराज वल्याळ मार्ग असे नांव देण्यात आले असल्याने सदरचा प्रस्ताव वगळणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका.

M.NO 642018000166614

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मामुली/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र. ५१ ठ. क्र. ९०
दि. २८/५/१५ रोजी ठेवला खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



सोलापूर महानगरपालिका हद्दवाढ भागातील प्र.क्र. १२ नवले वस्ती, कल्पना नगर लोकमंगल हॉस्पीटल पासून ते प्रिसिजन फॅक्टरीच्या पाठीमागे गेल्या ३० ते ४० वर्षापासून ओपन नाला वाहत असून, काही प्लॉटधारकांनी त्या नाल्यावर अनधिकृतपणे मुरुम व आजोरा टाकून तेथील अस्तित्वात असलेला नाला बुजविण्याचा प्रयत्न करीत आहेत. त्यामुळे पाणी पुढे जाण्यास वाट मिळत नसल्याने परिसरात पाण्याचे डबके साचून रोगराई पसरत आहे. परिसरातील नागरिकांच्या घरामध्ये हे घाण पाणी जाऊन नागरिकांचे आरोग्य धोक्यात येत आहे. तरी तातडीने उपाययोजना करुन हे पाणी पुढे जाण्यासाठी तातडीने प्लॅन व एस्टीमेट करुन व नाला बांधण्यास व येणा-या खर्चास मान्यता देणेस्तव आलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले.

मा. आयुक्त यांनी अभिप्राय द्यावा.

(सही) P.P.
नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका.

M. NO. 6420180001 6615

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मामुली/विशेष सर्व साधारण सभेपुढे विषय क्र. ४/२ ठ. क्र. ९८ दि. २५/५/१९ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



सोलापूर महानगरपालिका प्र.क्र. १२ मधील एम.आय.डी.सी. सुनिल नगर, आशा नगर, कलावती नगर, कामगार वसाहत, वज्रेश्वरी नगर, सिध्दारामेश्वर नगर, शिवलिंग नगर, अविनाश नगर, अरफात नगर इत्यादी भागातील नागरिकांसाठी आजतागायत एकही बाग करण्यात आलेली नसून या भागातील नागरिकांच्या विरंगुळासाठी व आरोग्य सदृढ राहण्याच्या दृष्टीने बाग व वॉकिंग ट्रॅकची आवश्यकता आहे. तरी एम.आय.डी.सी. मधील यंत्रमागधारक संघाच्या कार्यालय मागील वि.क्र. ३ अंतर्गत येणा-या व आरोग्य निरीक्षक कार्यालय लगत असणारी सोलापूर महानगरपालिकेच्या हद्दीतील ओपन जागेतील बागेकरिता व वॉकिंग ट्रॅक करिता प्लॅन व एस्टीमेट करुन व बाग विकसीत करण्यास व येणा-या खर्चास मान्यता देणेस्तव आलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले.

मा. आयुक्त यांनी अभिप्राय द्यावा.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका.

M.NO.64201800016617

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/सामुली/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज.५.३.ठ. क........११
दि.२५।५।१८....रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



सोलापूर महानगरपालिका प्र.क्र. १९ मधील परिसरातील भावनाऋषी नगर, जगदंबा नगर, ज्योती नगर, श्रीदेवी नगर भाग-१ व २, रविंद्र नगर, गवळी वस्ती, परळकर नगर, बाबूराव नगर, सिध्देश्वर नगर, गुरुदेव नगर, गणेश नगर, श्रीशैल नगर, चैतन्य नगर, सागर नगर, कुमारस्वामी नगर, भूलक्ष्मी नगर, महानंदा नगर, महालक्ष्मी नगर, निलम श्रमजिवी नगर, राजरत्न नगर, विनायक नगर, सिध्दरामेश्वर नगर, निवारा नगर आदि भागातील नागरिकांसाठी आजतागायत एकही बाग करण्यात आलेली नसून या भागातील नागरिकांच्या विरंगुळासाठी व आरोग्य सुदृढ राहण्याच्या दृष्टीने बाग व वॉकिंग ट्रॅकची आवश्यकता आहे. तरी आकाशवाणी केंद्र ते निलम नगर रोडवरील गवळी वस्ती समोर असणा-या म.न.पा. हद्दीतील एम.आय.डी.सी. च्या मोकळया जागेत बागेकरिता व वॉकिंग ट्रॅक करिता प्लॅन व एस्टीमेट करुन बाग विकसीत करण्यास व येणा-या खर्चास मान्यता देणेस्तव आलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले.

मा. आयुक्त यांनी अभिप्राय द्यावा.

(सही) P.P.
नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका.

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मामुली/विशेष सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.जा ५५ ठ. क्र. 900 दि. 24.5.18 रोजी ठेवता खालील प्रो. ठराव बहुमताने/सर्वानुमते पास झाला.

M.NO. 6420180001661

५५

सार्वजनिक चळवळीच्या माध्यमातून महाराष्ट्राला दुष्काळमुक्त करण्यासाठी अथवा दुष्काळावर मात करण्यासाठी अभिनेता अमीर खान यांनी पाणी फाऊंडेशनच्या माध्यमातून पाणी बचत उपक्रम सुरु केला आहे. या फाऊंडेशनमध्ये शहरातील नागरीकांनी सहभाग घेऊन उपक्रम राबविणेकामी त्यांची जलमित्र म्हणून नोंदणी करुन त्यांना प्रोत्साहन देत आहेत. शेकडे गावांमधून सकाळी व संध्याकाळी अशा दोन सत्रात हा उपक्रम राबविला जात आहे. या उपक्रमामुळे सन २०१६ व सन २०१७ या दोन्ही वर्षातील सत्यमेव जयते, वॉटर कप उपक्रमातून एकूण १० हजार कोटी लिटर पाण्याची साठवून करण्यात आलेली आहे. स्वत: श्री. अमीर खान यांनी फाऊंडेशनच्यावतीने पत्नीसह सोलापूर येथील अनेक गावामध्ये वरील फाऊंडेशनच्यावतीने पाणी बचाव या उपक्रमाद्वारे श्रमदान करुन एक आदर्श निर्माण केलेला आहे. अशा प्रकारे उपक्रमात समाविष्ठ होणा-या व पाण्याची साठवणूक करण्या-या गावातील संस्थाना लाखो रुपयांचे बक्षित देखील देण्यात येणार आहे. समाजातील प्रत्येक स्तरातील लोकांना सोबत घेऊन पाणी फाऊंडेशनचा प्रवास आजवर यशस्वी केलेला आहे. संपूर्ण महाराष्ट्रात नव्हे तर देशात ही योजना राबविणेकामी अभिनेता अमीर खान यांनी प्रोत्साहन दिलेबद्दल आजच्या काळाची गरज बनलेल्या पाणी बचाव योजनेच्या माध्यमातून गाव पातळीवर लोक चळवळ उभी करुन पाणी बचतीचे महत्व समाजाला देत आहेत. याकामी तरुणाईला या विधायक कामासाठी खेचून त्यांना महत्व पटवून देऊन, एक विधायक उपक्रम राबविणा-या अमीरखान यांना सोलापूर महानगरपालिकेच्यावतीने मानपत्र देऊन, यथोचित गौरव करणेस, सत्कार करणे व यकामी येणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका